Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**C**

# Paper-II
# SOCIOLOGY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) ................................................

2. (Signature) .........................................

(Name) ................................................

Seat No. [ ]

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. [ ]

(To be filled by the Candidate)

## MAY - 14216

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Sociology
## Paper II
# समाजशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This paper contains **Fifty (50)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Who has defined a symbol as the stimulus whose response is given in advance ?
   - (A) G. H. Mead
   - (B) C. H. Cooley
   - (C) Herbert Blumer
   - (D) E. Goffman

2. The main purpose of positivist research is to :
   - (A) Create positive ideas in society
   - (B) Enable policy-makers to formulate guidelines for developing social policies
   - (C) To do intuitive computational data collection
   - (D) To develop and test hypothesis

1. संकेत हा एक प्रोत्साहक असतो की ज्याचा प्रतिसाद हा अगोदरच सूचित होत असतो, अशी व्याख्या कोणी केली आहे ?
   - (A) जी. एच. मीड
   - (B) सी. एच. कूले
   - (C) हर्बर्ट ब्लूमर
   - (D) ई. गॉफमन

2. वस्तुनिष्ठ संशोधनाचा मुख्य उद्देश कोणता असतो ?
   - (A) समाजात वस्तुनिष्ठ विचार निर्माण करणे
   - (B) सामाजिक धोरणांच्या विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे मांडण्यासाठी धोरण निर्मिती करणाऱ्यांना प्रवृत्त करणे
   - (C) आत्मज्ञानानुसार संगणकीय तथ्य संकलन करणे
   - (D) गृहीतक विकसित करणे आणि तपासणे

3. Given below are statements, Assertion and Reason—Read it and choose the answer from the given codes :

**Assertion (A) :**

The principle of Replication is a principle of experimental design.

**Reason (R) :**

In the principle of Replication, the experiment should be repeated more than once.

*Codes* :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true, but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

3. खाली विधाने, प्रतिपादन आणि कारणे दिली आहेत ते नीट वाचून खाली दिलेला संकेतांकातून योग्य ते उत्तर निवडा :

**प्रतिपादन (A) :**

प्रतिकृतीचे मूलतत्त्व हे प्रयोगात्मक आराखड्याचे मूलतत्त्व आहे.

**कारण (R) :**

प्रतिकृतीच्या मूलतत्त्वात, प्रयोगाची एकापेक्षा अनेकदा पुनरावृत्ती होत असते.

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) हे दोन्हीं बरोबर आहे आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) हे दोन्ही बरोबर आहे परन्तु (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे परन्तु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे परन्तु (R) हे बरोबर आहे

4. 'Before and After' observations are made in studies involving :
   (A) Exploratary design
   (B) Experimental design
   (C) Descriptive design
   (D) Cross-cultural design

5. Who has used 'participant observation' method for collection of data ?
   (A) Radcliffe Brown
   (B) S. C. Dube
   (C) Malinowski
   (D) N. K. Bose

6. What is the key feature of qualitative research ?
   (A) Relatively unstructured and happens in a natural field setting
   (B) It is too difficult and vague
   (C) It involves ethical and moral issues
   (D) It is more speculative

4. 'पूर्व आणि पश्चात' निरीक्षणाच्या अध्ययनात कशाचा समावेश होतो ?
   (A) अन्वेषणात्मक आराखडा
   (B) प्रयोगात्मक आराखडा
   (C) वर्णनात्मक आराखडा
   (D) आंतर-सांस्कृतिक आराखडा

5. तथ्य संकलनासाठी 'सहभागी निरीक्षण' ही पद्धती कोणी वापरली ?
   (A) रॅडक्लिफ ब्राऊन
   (B) एस. सी. दुबे
   (C) मॅलिनोवस्की
   (D) एन. के. बोस

6. गुणात्मक संशोधनाचे मुख्य वैशिष्ट्य कोणते आहे ?
   (A) सापेक्षत: असंरचित आणि नैसर्गिक क्षेत्र रचनेशी शक्य
   (B) अत्यंत कठीण आणि संदिग्ध
   (C) त्यामध्ये नीती आणि नैतिक मुद्यांचा समावेश असतो
   (D) ते अधिक काल्पनिक असते

7. Who has introduced case study method in social investigation ?

(A) A. G. Lundberg

(B) Fredrick Leplay

(C) John Galtung

(D) N. Anderson

8. Stratified sampling can be adopted when :

(A) The phenomenon displays greater homogeneity

(B) In case of lesser homogeneity of the universe

(C) In very micro context

(D) While dealing with subjective data

7. सामाजिक अन्वेषणामध्ये व्यष्टी अध्ययन पद्धती कोणी सुरू कोली ?

(A) ए. जी. लुंडबर्ग

(B) फ्रेडरिक लीप्ले

(C) जॉन गाल्टुंग

(D) एन. अँडर्सन

8. स्तरीत नमुना निवड केव्हा वापरली जाते ?

(A) घटनेतील अधिकाधिक एकात्मता दिसत असेल तर

(B) समग्राची एकात्मता कमी असेल तर

(C) अधिक सूक्ष्मतेच्या संदर्भात

(D) व्यक्तिनिष्ठ तथ्यांची हाताळणी करताना

9. The logical model in which specific expectations of hypothesis are developed on the basis of general principles is known as :

   (A) induction

   (B) deduction

   (C) reduction

   (D) accumulation

10. Which is the other type than the basic types of interviews distinguished in social research namely structured and semi-structured ?

    (A) Closed structured

    (B) Unstructured

    (C) Sequential

    (D) Clinical

9. सर्वसाधारण मूर्ततत्त्वांच्या आधारावर तर्कसंगत प्रतिमानात विशिष्ट अपेक्षित गृहीतकांचा जेव्हा विकास केला जातो तेव्हा त्याला काय म्हणतात ?

   (A) विगमन

   (B) निगमन

   (C) कपातीकरण

   (D) संचयता

10. सामाजिक संशोधनात विभेदित केलेल्या संरचित आणि अर्ध-संरचित मुलाखतीच्या मुलभूत प्रकाराव्यतिरिक्त आणखी एक तिसरा प्रकार कोणता आहे ?

    (A) बंदिस्त संरचित

    (B) असंरचित

    (C) क्रमवार

    (D) चिकित्सक

11. The study of recorded human communications in the books, magazines, web-pages, poems, news-papers, songs, speeches, letters, e-mail, messages, laws and constitutions is known as :

(A) Data Analysis

(B) Statistical Analysis

(C) Content Analysis

(D) Historical Analysis

12. A technical term used in connection with the elaboration model refers to :

(A) Codification

(B) Generalization

(C) Elucidation

(D) Interpretation

11. पुस्तके, नियतकालिके, वेबपेजेस, कविता, वृत्तपत्रे, गाणी, भाषणे, पत्रे, ई-मेल, संदेश, कायदे आणि राज्यघटना यातील मानवी संप्रेषणाच्या नोंदीकृत अध्ययनास काय म्हणतात ?

(A) तथ्य विश्लेषण

(B) संख्यात्मक विश्लेषण

(C) आशय विश्लेषण

(D) ऐतिहासिक विश्लेषण

12. विशदीकृत प्रतिमानाच्या संदर्भात जी तांत्रिक संज्ञा वापरली जाते ती कोणत्या नावाने ओळखली जाते ?

(A) सांकेतिकीकरण

(B) सामान्यीकरण

(C) स्पष्टीकरण

(D) अन्वयार्थीकरण

13. A variable that has two attribute is :
    (A) Nominal
    (B) Binomial
    (C) Variate
    (D) Bivariate

14. Which is *not* a type of exploratory studies ?
    (A) Expert Surveys
    (B) Experience Surveys
    (C) Case Studies
    (D) Test Units

15. A measure of central tendency that represents the midpoint in a distribution of ordered data is :
    (A) Median
    (B) Mean
    (C) Matrix
    (D) Correlation

13. चलाला जेव्हा दोन गुणधर्म असतात तेव्हा त्याला काय म्हणतात ?
    (A) नामभेददर्शक
    (B) द्विनामभेददर्शक
    (C) चलीय
    (D) द्विचलीय

14. कोणता प्रकार हा अन्वेषणात्मक अध्ययनाचा प्रकार होत नाही ?
    (A) विशेषज्ञ सर्वेक्षण
    (B) अनुभविक सर्वेक्षण
    (C) व्यष्टी अध्ययन
    (D) तपास घटक

15. केन्द्रीय प्रवृत्तीचे मापन जेव्हा सुव्यवस्थित तथ्यांच्या वितरणातील मध्यबिंदूचे प्रतिनिधित्व करते तेव्हा ते काय म्हणून ओळखले जाते ?
    (A) मध्यांक
    (B) मध्य
    (C) संच
    (D) सहसंबंध

16. Which among the following is the major limitation of survey research ?

    (A) Survey research touches only the surface

    (B) Survey research is utilitarian in orientation

    (C) Survey research is market-oriented

    (D) Survey research is always unreliable

17. An attempt to bring about a greater accuracy which is desired by all the sciences is called as .................. .

    (A) Content analysis

    (B) Reliability

    (C) Validity

    (D) Scaling

16. खालीलपैकी कोणती सर्वेक्षण संशोधनातील प्रमुख मर्यादा आहे ?

    (A) सर्वेक्षण संशोधन हे केवळ पृष्ठभागालाच स्पर्श करते

    (B) सर्वेक्षण संशोधन म्हणजे अभिमुखी-करणातील उपयोगिता आहे

    (C) सर्वेक्षण संशोधन हे बाजार अभीमुखीकरण आहे

    (D) सर्वेक्षण संशोधन हे नेहमीच अविश्वसनीय असते

17. सर्वच विज्ञानांना अपेक्षित असणारी अचुकता शोधून शोधून काढण्याच्या प्रयत्नाला कोणत्या नावाने ओळखले जाते ?

    (A) आशय विश्लेषण

    (B) विश्वसनीयता

    (C) प्रामाण्य

    (D) अनुमापन

18. A largely unstructured interview in which the respondent is asked to recall events from his or her past and to reflect on them :
(A) Interview
(B) Observation
(C) Oral history
(D) Interview guide

19. The value that occurs most frequently in a distribution of values is called :
(A) Mean
(B) Median
(C) Mode
(D) Dispersion

20. The degree to which a measure of a concept is stable refers to :
(A) Reliability
(B) Validity
(C) Correlation
(D) Dispersion

18. मोठ्या प्रमाणातील असंरचित मुलाखतीत की ज्यामध्ये प्रतिसादकाला त्याच्या किंवा तिच्या दृष्टीने घडलेल्या घटना आठवण्यास सांगितले जाते आणि त्यावर प्रतिक्षिप्त होण्यास सांगितले जाते त्याला काय म्हणतात ?
(A) मुलाखत
(B) निरीक्षण
(C) जीवन इतिहास
(D) मुलाखत मार्गदर्शक

19. मूल्यांच्या वितरणात जेव्हा मूल्य मोठ्या वारंवारितेने घडत असते तेव्हा त्याला काय म्हणतात ?
(A) मध्य
(B) मध्यांक
(C) बहुलक
(D) विचलन (डिसपर्सन)

20. संकल्पनेच्या परिमाणाचे प्रमाण जेव्हा स्थिर असते तेव्हा त्याला काय म्हणतात ?
(A) विश्वसनीयता
(B) प्रामाण्य
(C) सहसंबंध
(D) विस्खलन

21. Who among the following is *not* associated with the specialistic or formalistic school of sociology ?
    (A) George Simmel
    (B) Max Weber
    (C) Von Wiese
    (D) Emile Durkheim

22. According to Tonnies, neighbourhood is a type of :
    (A) Community
    (B) Primary group
    (C) Social group
    (D) Secondary group

23. The concept of 'role set' was propounded by :
    (A) R. E. Park
    (B) G. H. Mead
    (C) E. Goffman
    (D) R. K. Merton

21. खालीलपैकी कोण समाजशास्त्राच्या विशेषित अथवा स्वरूपात्मक संप्रदायाशी संबंधित **नाही** ?
    (A) जॉर्ज सिमेल
    (B) मॅक्स वेबर
    (C) व्हॉन वीस
    (D) एमिल डुरखाईम

22. टोनीसच्या मते, शेजारधर्म हा कशाचा प्रकार आहे ?
    (A) समुदाय
    (B) प्राथमिक समूह
    (C) सामाजिक समूह
    (D) दुय्यम समूह

23. 'भूमिका संच' ही संकल्पना कोणी प्रस्तुत केली ?
    (A) आर. ई. पार्क
    (B) जी. एच. मीड
    (C) ई. गॉफमन
    (D) आर. के. मर्टन

24. Which of the following is *not* a characteristic of community ?

(A) Spontaneous birth

(B) Temporary nature

(C) Common way of life

(D) Self-sufficiency

24. खालीलपैकी कोणते समुदायाचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) उत्स्फूर्त निर्मिती

(B) तात्पुरते स्वरूप

(C) समान जीवनक्रम

(D) आत्मनिर्भरता

25. Who has stated that 'family is a nursery of human nature' ?

(A) Ogburn

(B) Charles Cooley

(C) Horton and Hunt

(D) Kimball Young

25. 'मानवी स्वभावाची जोपासना कुटुंब करते' असे कोणी म्हटले आहे ?

(A) ऑगबर्न

(B) चार्लस कुले

(C) हॉर्टन आणि हंट

(D) किंबॉल यंग

26. Social values indicate :

(A) Group standards

(B) Institutional standards

(C) Community standards

(D) Cultural standards

26. सामाजिक मूल्ये कशाची निदर्शक आहेत ?

(A) समूह प्रमाणके

(B) संस्थात्मक प्रमाणके

(C) सामुहिक प्रमाणके

(D) सांस्कृतिक प्रमाणके

27. Self ideas or self-attitudes develop by a process of imaginning, what others think of us is known as :

(A) Looking glass self process

(B) Generalised others

(C) Role playing

(D) Collective representation

28. Who said that 'An institution consists of a concept and structure' ?

(A) Kingsley Davis

(B) Robert MacIver

(C) Emile Durkheim

(D) William Summner

29. The concept of 'Primary Group' was introduced by Charles Cooley through his book ...................... .

(A) Human Society

(B) Social Organisation

(C) Fundamentals of Sociology

(D) Social System

27. आपल्या विषयी इतरांची काय धारणा होत असेल या प्रक्रियेतून स्वत:चे विचार किंवा स्वत:चे दृष्टिकोन जेव्हा विकसित होत असतात त्याला कोणत्या नावाने ओळखले जाते ?

(A) स्वप्रतिबिंबीत प्रतिमा प्रक्रिया

(B) सामान्यीकृत इतर

(C) भूमिका वठविणे

(D) सामुहिक प्रतिनिधित्व

28. कोणत्याही संस्थेच संकल्पना व रचना असे दोन भाग असतात असे कोण म्हणते ?

(A) किंग्जले डेव्हिस

(B) रॉबर्ट मॅकआयव्हर

(C) एमिल डुरखाईम

(D) विल्यम सम्नर

29. चार्लस् कुले यांनी 'प्राथमिक समूह' ही संकल्पना कोणत्या पुस्तकातून मांडली ?

(A) ह्युमन सोसायटी

(B) सोशल ऑर्गनायझेशन

(C) फंडामेंटल्स ऑफ सोशिऑलॉजी

(D) सोशल सिस्टीम

30. Who among the following had differentiated between 'in-groups' and 'out-groups' ?

(A) W. G. Summner

(B) C. H. Cooley

(C) F. Q. Giddings

(D) P. A. Sorokin

31. As a 'society in miniature', the school teaches discipline, respect for authority, mutual responsibility and the value of the collective good. Who pointed out this key role of schools ?

(A) Parsons

(B) Durkheim

(C) Bernstein

(D) Althusser

30. खालीलपैकी कोणी 'अंतर्समूह' आणि 'बहिर्समूह' असा फरक केला आहे ?

(A) डब्लू. जी. सम्नर

(B) सी. एच. कुले

(C) एफ. क्यु. गिडिंग्ज

(D) पी. ए. सोरोकिन

31. 'एक लघुसमाज' या नात्याने शाळा, ही शिक्षण, अधिकाऱ्यांप्रती आदर, पारस्पारिक उत्तरदायित्व आणि सामुहिक गुणांचे मूल्य या गोष्टी शिकविते. शाळेची ही महत्त्वाची भूमिका कोणी मांडली आहे ?

(A) पार्सन्स

(B) डुरखाईम

(C) बर्नस्टीन

(D) अल्थूजर

32. Choose the correct sequence of the type of marriage as given in the book 'History of Human Marriage' by Westermark :

(I) Polygamous marriage

(II) Group marriages

(III) Promiscuous

(IV) Monogamous marriage

*Codes* :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | (IV) | (II) | (I) | (III) |
| (B) | (I) | (II) | (IV) | (III) |
| (C) | (II) | (I) | (III) | (IV) |
| (D) | (III) | (II) | (I) | (IV) |

33. When the working women have to select the convenient role to avoid the role conflict, it is known as :

(A) Role strain

(B) Role priority

(C) Role set

(D) Role performance

32. वेस्टरमार्कने 'हिस्टरी ऑफ ह्यूमन मॅरेज' ह्या पुस्तकात दिल्याप्रमाणे विवाहाच्या प्रकारांचा अचूक क्रम निवडा :

(I) अनेक विवाह

(II) समुह विवाह

(III) स्वैराचार

(IV) एक विवाह

**संकेतांक** :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | (IV) | (II) | (I) | (III) |
| (B) | (I) | (II) | (IV) | (III) |
| (C) | (II) | (I) | (III) | (IV) |
| (D) | (III) | (II) | (I) | (IV) |

33. जेव्हा नोकरी करणाऱ्या स्त्रियांना भूमिका संघर्ष टाळण्यासाठी त्यांच्या सोयीची भूमिका निवडावी लगते तेव्हा त्यास काय म्हणतात ?

(A) भूमिका तणाव

(B) भूमिका प्राधान्य

(C) भूमिका मंच

(D) भूमिका वर्तन

34. The rule whereby the married couple establish their own residence is called :

(A) Avanculocal residence

(B) Bilocal residence

(C) Patrilocal residence

(D) Neolocal residence

35. Who among the following says that 'marriage is a contract for the production and maintenance of children' ?

(A) Edward Westermarck

(B) Robert H. Lowie

(C) Malinowski

(D) Levi-Strauss

36. Anticipatory socialization leads to :

(A) Disintegrated personality

(B) Upward social mobility

(C) Antisocial personality

(D) Normlessness

34. ज्या नियमाना अनुसरून नवपरिणीत जोडपे जेव्हा त्यांचे स्वत:चे निवासस्थान प्रस्थापित करते तेव्हा त्याला काय म्हणतात ?

(A) मातुलस्थानिय निवास

(B) द्विस्थानीय निवास

(C) पितृस्थानीय निवास

(D) नवस्थानीय निवास

35. खालीलपैकी कोणी असे म्हटले आहे की 'विवाह हा मुलांना जन्म देणे व त्यांचा उदरनिर्वाह करण्यासाठीचा एक करार आहे' ?

(A) एडवर्ड वेस्टरमार्क

(B) रॉबर्ट एच्. लुई

(C) मॅलिनोवस्की

(D) लेव्ही-स्ट्रॉस

36. अपेक्षित समाजीकरण काय साध्य करते ?

(A) विघटित व्यक्तिमत्त्व

(B) ऊर्ध्व सामाजिक गतिशीलता

(C) समाजविघातक व्यक्तिमत्त्व

(D) प्रमाणकशून्यता

37. Who said that 'when a class is somewhat strictly hereditary' we may call it a caste :

(A) C. H. Cooley

(B) Herbert Risely

(C) D. N. Majumdar

(D) T. N. Madan

38. Given below are statements, Assertion and Reason—Read it and choose the answer from the given codes :

**Assertion (A) :**

Policy of Reservation has led to the growth of a small group of elites from amongst the backward classes.

**Reason (R) :**

The benefits of Reservation are mainly cornered by them.

*Codes* :

(A) Both (A) and (R) are true

(B) Both (A) and (R) are true, but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

37. 'जेव्हा वर्ग हा काहीसा काटेकोरपणे आनुवंशिक असतो तेव्हा आपण त्याला जात असे म्हणतो' असे कोणी म्हटले आहे ?

(A) सी. एच. कुले

(B) हर्बर्ट रिस्ले

(C) डी. एन. मजुमदार

(D) टी. एन. मदन

38. खाली विधाने, प्रतिपादन आणि कारणे दिली आहेत. ते नीट वाचून खाली दिलेल्या संकेतांकातून योग्य ते उत्तर निवडा :

**प्रतिपादन (A) :**

आरक्षणाचे धोरण मागासवर्गीयातून एका छोट्या प्रतिष्ठित समूहाच्या वाढीसाठी उद्युक्त करणारे ठरले.

**कारण (R) :**

आरक्षणाचे फायदे प्रामुख्याने त्यानचि हस्तगत केले.

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) हे दोन्ही बरोबर आहे

(B) (A) आणि (R) हे दोन्ही बरोबर आहे, परन्तु (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे, परन्तु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे, परन्तु (R) हे बरोबर आहे

39. "Caste' is a Brahmanic child of Indo-Aryan culture cradled in the land of the Ganges and thence transferred to other parts of India." Who has said this ?

(A) MacIver

(B) Majumdar

(C) Ghurye

(D) Risley

39. ‘‘ ‘जात’ हे एक इंडो-आर्यन संस्कृतीचे अपत्य असून गंगेच्या प्रदेशात ते स्थिरावले आणि नंतर भारताच्या इतर भागात ते पसरत गेले.’’ असे कोणी म्हटले आहे ?

(A) मॅकआयव्हर

(B) मजुमदार

(C) घुर्ये

(D) रिस्ले

40. When the norms gives directives and common for all are known as :

(A) Practical norms

(B) Relational norms

(C) Ideal norms

(D) Regulative norms

40. जेव्हा नियमने मार्गदर्शक आणि सर्वांसाठी समान असतात तेव्हां त्याना काय म्हणतात ?

(A) व्यहार्य नियमने

(B) संबंधित नियमने

(C) आदर्श नियमने

(D) नियंत्रणात्मक नियमने

41. Who has written the following book ?

'Structure and Function in Primitive Society' ?

(A) Nadel

(B) Radcliffe Brown

(C) Levi-Strauss

(D) Durkheim

42. Parsons regards institutionalization as the fundamental integrative mechanism of :

(A) Social structure

(B) Social equilibrium

(C) Social change

(D) Social system

41. 'स्ट्रक्चर अँड फंक्शन इन प्रिमिटीव्ह सोसायटी' हे पुस्तक कोणी लिहिले ?

(A) नॅडेल

(B) रेडक्लिफ ब्राऊन

(C) लेव्ही-स्ट्रॉस

(D) डुरखाईम

42. पार्सन्स याने संस्थीकरण ही एक मुलभूत एकात्मिक यंत्रणा म्हणून कोणत्या दृष्टीने विचारात घेतली ?

(A) सामाजिक संरचना

(B) सामाजिक संतुलन

(C) सामाजिक परिवर्तन

(D) सामाजिक व्यवस्था

43. According to Blumer which one of the following is *not* a Social Action ?
    (A) Wedding
    (B) Maintaining a diary
    (C) Family dinner
    (D) Educational tour

44. According to R. K. Merton status involves :
    (A) A single role
    (B) A single associated role
    (C) An array of associated roles
    (D) Dissociated roles

45. Randoll Collins is one of the advocates of :
    (A) Formal conflict theory
    (B) Dialectic sociology
    (C) Radical sociology
    (D) Analytic conflict theory

43. ब्लूमरच्या मते खालीलपैकी कोणती सामाजिक क्रिया **नाही** ?
    (A) लग्नसमारंभ
    (B) दैनंदिनी लिहिणे
    (C) कौटुंबिक भोजन
    (D) शैक्षणिक सहल

44. आर. के. मर्टनच्या मते दर्जामध्ये कशाचा समावेश होतो ?
    (A) एक विशिष्ट भूमिका
    (B) एक विशिष्ट सहसंबंधी भूमिका
    (C) सहसंबंधी भूमिकांची मांडणी
    (D) असाहचर्यात्मक भूमिका

45. रँडॉल कॉलिन्स हा कशाचा पुरस्कर्ता आहे ?
    (A) स्वरूपात्मक संघर्ष सिद्धान्त
    (B) द्वंद्वात्मक समाजशास्त्र
    (C) जहालवादी समाजशास्त्र
    (D) विश्लेषणात्मक संघर्ष सिद्धांत

46. Which one of the following forms the basis of reference group according to R. K. Merton ?

(A) Relative equality

(B) Relative deprivation

(C) Relative difficulties

(D) Relative association

46. आर. के. मर्टनच्या मते, खालीलपैकी कोणता घटक संदर्भ समुहाचा आधार बनतो ?

(A) सापेक्ष समानता

(B) सापेक्ष वंचितता

(C) सापेक्ष अडचणी

(D) सापेक्ष सहसंबंध

47. In which of the following functionalism there are three system levels : the biological, the social structural, and the symbolic, in :

(A) Nadel's functionalism

(B) Merton's functionalism

(C) Malinowski's functionalism

(D) Spencer's functionalism

47. खालीलपैकी कोणत्या प्रकार्यवादात जैविक, सामाजिक संरचनात्मक आणि सांकेतिक अशा तीन व्यवस्था पहावयास मिळतात ?

(A) नॅडेल यांचा प्रकार्यवाद

(B) मर्टन यांचा प्रकार्यवाद

(C) मॅलिनोवस्की यांचा प्रकार्यवाद

(D) स्पेन्सर यांचा प्रकार्यवाद

48. The book entitled 'Magic, Science and Religion' was written by :

(A) Radcliffe Brown

(B) Levi-Strauss

(C) S. F. Nadel

(D) Malinowski

49. Who said that 'Men make their own history, but not under circumstances of their own choosing' ?

(A) Karl Marx

(B) Gramsci

(C) Althusser

(D) Dahrendorf

50. According to Marxian viewpoint, poverty is not a result of scarcity, but the result of :

(A) Population explosion

(B) Alienation

(C) Exploitation

(D) Class antagonism

48. 'मॅजिक, सायन्स अँड रिलिजन' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) रॅडक्लिफ ब्राऊन

(B) लेव्ही-स्ट्रॉस

(C) एस. एफ. नॅडेल

(D) मॅलिनोवस्की

49. 'माणसे स्वतःचा इतिहास स्वतःचे निर्माण करतात, पण कोणत्याही परिस्थितीत स्वतःच्या निवडीनुसार मात्र नाही ? असे कोणी म्हटले आहे ?

(A) कार्ल मार्क्स

(B) ग्रामशी

(C) अल्थूजर

(D) डॅऱ्हेनडॉर्फ

50. मार्क्सच्या मते, दारिद्र्य हा दुर्भिक्ष्याचा परिणाम नाही तर मग कशाचा परिणाम आहे ?

(A) लोकसंख्या विस्फोट

(B) अलगीकरण

(C) उपयोग

(D) वर्ग संघर्ष

## ROUGH WORK